पुण्य नगरी
शुक्रवार, २१ जुलै २०१७
smart Pune

# आयुर्वेदाला तंत्रज्ञानाची जोड हवी : डॉ. जामकर



**पुणे : प्रतिनिधी**

आयुर्वेद हे भारतीय परंपरेने दिलेले आपले शास्त्र आहे. त्यामध्ये अनेक मोठ्या आजारांनाही बरे करण्याची क्षमता आहे. आयुर्वेदाला तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड मिळाल्यास त्यामध्ये सुपरस्पेशालिटी येऊ शकते, असे मत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांनी केले.

आरोग्यवर्धिनी चिकित्सालय आणि बीव्हीजी इंडियातर्फे 'केशायुर्वेद'च्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त टिळक स्मारक मंदिरात आयोजित 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' पुस्तकाचे प्रकाशन व केशायुर्वेदच्या तीस उपकेंद्र प्रमुखांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी बीव्हीजी इंडियाचे संचालक दत्ताजी गायकवाड, संचालिका वैशाली गायकवाड, स्वप्नाली गायकवाड, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सतीश डुंबरे, 'आयुष'च्या संचालिका डॉ. सरिता गायकवाड, केशायुर्वेदचे संचालक वैद्य हरीश पाटणकर, स्नेहल पाटणकर, मंदार जोगळेकर आदी उपस्थित होते. यावेळी असोसिएशन ऑफ कॉस्मेटॉलॉजी, ट्रायकोलॉजी अँड टेक्नॉलॉजीची स्थापना करण्यात आली.

जामकर म्हणाले, आयुर्वेदिक उपचारपद्धतीचा अभ्यास करून सुपरस्पेशालिटी मिळविण्याकडे सध्या कल वाढत आहे. परंतु, आयुर्वेदात आणखी मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. केसांची आयुर्वेदाच्या साहाय्याने निगरानी होणे ही काळाची गरज आहे. आयुर्वेदाची सेवा करणाऱ्यांनी त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. आपण करीत असलेल्या संशोधनाचे दस्त जपले पाहिजेत. त्याला आधुनिकतेची जोड दिली पाहिजे.

मंदार जोगळेकर म्हणाले, आयुर्वेदामध्ये शास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन होत आहे, ही जमेची बाजू आहे. पाश्चात्य देशांमध्ये संशोधनाच्या जोरावर आयुर्वेद सिद्ध केले जात आहे. अशावेळी आपले मूळ शास्त्र असलेले आयुर्वेद जगभर पोहोचले पाहिजे. त्यासाठी संशोधन आणि साहित्यनिर्मिती व्हायला हवी.